# प्रेसनोट दि.१८/०७/२०१८

## हिंजवडी मधील फ्लॅटवर छापा
## ०७ सज्ञान मुलीची वेश्या व्यवसायतुन सुटका
## वेश्या व्यवसायातील ५ एजंट अटकेत

दि.१७/७/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे, यांना पोलीस हवालदार नरेश बलसाने यांचेकडुन माहीती मिळाली की, इसम नामे कुमार प्रधान व त्याचा साथीदार सनी हे भारतातील विविध राज्यातील व नेपाळमधील मुलींना श्री. लक्ष्मी नरसिंहा बिल्डींग, गणेश मदीर जवळ, हिंजवडी पुणे येथील फ्लॅटवर ठेवुन त्यांचेकडे वेश्यागमनासाठी गि-हाईक पाठवुन वेश्याव्यवसाय करुन घेत आहेत अशी बातमी मिळाली.

त्यावरुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, गुन्हे शाखा पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे व सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी, कर्मचारी व हिंजवडी पोलीस स्टेशनकडील अधिकारी व कर्मचारी यांनी संयुक्त कारवाई करुन श्री. लक्ष्मी नरसिंहा पी.जी.बिल्डींग,गणेश मदीर जवळ, हिंजवडी पुणे येथील दोन फ्लॅटमध्ये वेश्या व्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला.

छाप्या दरम्यान महाराष्ट्र राज्यातील २ पश्चिम बंगाल १, पंजाब १, दिल्ली १, नेपाळ देशाची १, मध्यप्रदेश -१, अशा वेगवेगळ्या राज्यातील व नेपाळ देशाची अशा एकुण ०७ मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन त्यांना वेश्या व्यवसायास लावणारे १. कुमार बलबहादुर प्रधान वय- ४०, सध्या रा. प्लॅट नं. पी ९ व पी १७, श्री.लक्ष्मी नरसिंहा बिल्डींग, गणेश मदीर जवळ हिंजवडी व मुळ गाव - मु.टंगला, पो.दरंग , जि.उदालगुडी, राज्य आसाम, २. रणजित बलबहादुर प्रधान,वय-२५ रा. मु.टंगला, पो.दरंग , जि. उदालगुडी, राज्य आसाम ३. शामसुंदर गंगाबहादुर नेवार, वय-२३ रा. बोटाबारी, उदलगुडी आसाम ४. बिजु भक्ती शर्मा वय २२ रा. बोरीगांव, खाउरंग, उदलगुडी आसाम, ५ बळीराम फोनी गौर वय २२ रा.नेपाळी गांव,पानेरी, उदलगुडी आसाम,व (६) सनी यांचे विरुध्द हिंजवडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ३५८/२०१८, पिटा ॲक्ट १९५६ चे क. ३,४,५, सह भादंवि कलम ३७०, ३७० अ,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अ नं १ ते ५ या आरोपींना कारवाईचे वेळी ताब्यात घेण्यात आले आहे.

कारवाईचे वेळी रोख रु. १०,०००/- आरोपींचे ०७ मोबाईल फोन, कंडोम पाकीटे असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत मुलींना रेस्क्यु फौंडेशन, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री. पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे, पोउनि योगिता कुदळे, पोलीस उप निरीक्षक व्यवहारे, नामदेव शेलार, प्रमोद म्हेत्रे, ज्ञानेश्वर देवकर, नरेश बलसाने, तुषार आल्हाट, सुनिल नाईक, कविता नलावडे, ननिता येळे, अनुराधा ठोंबरे, सचिन शिंदे यांनी व हिंजवडी पोलीस स्टेशनचे अधिकारी व स्टाफसह सयुंक्तीक कारवाई केली आहे.